Volume 9 (Issue 02)
Febuary-April 2019
ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

- A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

**Editor**
**Dr. R. V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email- info@jrdrvb.com Visit-www.jrdrvb.com

Scanned with AnyScanner

ISSN-2230-9578

**Journal of Research and Development**

**Volume 9 (Issue 02), Febuary-April 2019**

## INDEX



| Sr. No | Title | Page |
|---|---|---|
| 1 | Curriculum Design Freming: Need And Challenges<br>Prof dr. Pratibha tukaram patil | 1 |
| 2 | A Comparative Analysis of Service Areas of Agro Service Centres in Yawal Tahsil<br>Dr. Ramesh Vitthal Bhole | 4 |
| 3 | "Geographical Appraisal of Demographic Distribution in Piedmont Plain of Jalgaon District - Using Advance Cartographic Tools"<br>Nitin Samadhan Ghope | 7 |
| 4 | उच्च शिक्षणातील नवीन योजना<br>प्रा. अनिता रमेश वानखेडे | 18 |
| 5 | व्हॉलीबॉल खेळाडूंच्या (शारीरिक) क्षमता विकासावर (शस्त्रीय) प्लायोमेट्रिक प्रशिक्षण कार्यक्रमामुळे होणाऱ्या परिणामाचा अभ्यास<br>शैलेश कुमार चैत्राम पाटील | 21 |
| 6 | जनपद फर्रुखाबाद में जनसंख्या के सामाजि एवं अर्थिक घटन : एक प्रतीक अध्ययन<br>संजय सिंह | 24 |



Scanned with AnyScanner

Journal of Research & Development
Vol. 9 (Issue. 02), Febuary-April 2019
(ISSN-2230-9578)

# उच्च शिक्षणातील नवीन योजना

प्रा. अनिता रमेश वानखेडे सदगुरु शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगांव

**प्रस्तावना :-** " खरे सर्वोच्च शिक्षण फक्त आपल्या माहितीने परिपुर्ण करत नाही तर आपल्या जीवनाला त्यामुळे सर्वव्यापी लय प्राप्त होते". रविंद्रनाथ टागोर

भारतात १२५ कोटीच्या जनतेकरिता उच्च किंवा पदवी शिक्षण घेण्यासाठी ८०० विद्यापीठ आहेत. त्यात प्रामुख्याने केंद्रीय ,राज्य ,खाजगी, अभिमत आणि इतर सर्व प्रकारच्या विद्यापीठांचा समावेश आहे. त्यात विद्यापीठ अनुदान आयोगाने नियंत्रित केलेली बहुतांश विद्यापीठ आहेत. तसेच १०० राष्ट्रयदृष्ट्या महत्वाच्या सस्था ज्या संसद किंवा राज्य विधी मंडळाच्या विशेष कायद्यान्वये स्थापन केल्या जातात.आता संस्थांना फक्त व्याख्याने, भाषने,स्वगते, क्रमिक पुस्तके, व्यक्तीगत टिपणे नोंदी आणि वर्षानुवर्षे चालत आलेली परीक्षापध्दती यात बदल करुन नवीन शोध आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी पारंपारिक पध्दत सोडुन वेगळा दृष्टीकोन व नवीन योजनाचा वापर करावा लागेल .२१ वे शतक हे अभिनव कल्पनांचे शतक आहे.या घोषनेनुसार २०१० ते २०२० हे दशक नवकल्पनाचे दशक म्हणुन साजरे करण्याचे पंतप्रधान यांनी ठरविले नवकल्पना विभाग (MIC) आणि अटल रकिंग ऑफ इन्स्टिट्युशन्स ऑन इनोव्हेशन अचीव्हेमेंटस (AKIIA) ची स्थापना केली आहे.

**उच्च शिक्षणातील नवीन / कल्पक योजना :-**

**1. संशोधन आणि नवकल्पना उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थासाठी (HETS) स्टार्ट अप इंडिया योजना :-**

आपल्या देशातील सर्व उच्च शिक्षण संस्थामध्ये (HETS) पध्दतशीरपणे नवीन / कल्पक शोधांची सुरुवात करण्यासाठी युवा पिढीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करणे आणि मार्गदर्शक करणे त्यांना नवनवीन कल्पनांच्या शोधासाठी प्रेरीत करुन वाव देणे. तसेच सर्वतोपरी सहाय्य करणे या उद्देशाने या नव्या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे नवीन उत्पादके व प्रक्रियांचा शोध लागेल.व शोध लावणारे विद्यार्थी यशस्वी व्यावसायिक संशोधक म्हणून नावारुपाला येतील. यासाठी देशात १००० अशी संस्थात्मक नवनिर्मिती केंद्रे (IIC) स्थापन होणार आहेत. जी Stanford आणि MIT च्या दर्जाच्या तोडीस तोड अशी परिणामकारक उच्च शिक्षण प्रणाली उद्यास येईल.

**2. सहकार्यातुन अभ्यासविषयक संशोधन आणि प्रचार यासाठी योजना (SPARC)**

SPARC हा मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा नवा आणि GIAN च्या मागोमाग हाती घेतलेले उपक्रम आहे. भारतातील तसेच जगभरातील विध्दवान तसेच सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्था यांच्यात अभ्यास तसेच संशोधन विषयक सहकार्याला चालना देऊन भारतातील उच्च शिक्षणसंस्थांमधील वातावरण संशोधनासाठी अधिक अनुकुल बनविण्यासाठी सरकारने हा उपक्रम सुरु केला आहे. या योजनेमुळे प्राख्यात विद्यापीठांशी सहसंशोधन करार करुन आंतरराष्टीय संशोधनात भरीव कार्य होईल. यासाठी सरकार निधी उपलब्ध करुन देणार आहे.

Scanned with AnyScanner

भारतीय शिक्षण संस्थामध्ये परदेशी तज्ञ शिक्षक व मार्गदर्शकाच्या दर्जावर SPARC मुळे कमतरता भरुन येईल व संशोधनासाठी सकारात्मक वातावरण तयार होईल.

3. डिजीटल, भारत -ई-लिर्निंग :- virtual classroom,आणि massive open online cources (moocs) इ.उभारणी :-

उच्च शिक्षणासाठी विद्यापीठात प्रवेश न घेतलेल्या देशभरातील विविध विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षक आणि अभ्यासक्रम यांचा लाभ व्हावा तसेच त्यासाठी त्याना आवाजावी शैक्षणिक फि न भरता त्यांना हव्या त्या अभ्यासक्रमासाठी यासाठी आभासी वर्गाची उभारणी केली गेली. तसेच massive open online cources मध्ये शिक्षक-विद्यार्थी यांची मर्यादित वैचारीक देवाण घेवाण होते.परिक्षा देखील ऑनलाइन घेतली जाते. तसेच परीक्षांचा उपयोग विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळविण्यासाठी होतो. तसेच वरील अभ्यासक्रमातील व्याख्यान विद्यार्थी आपल्या उद्योग व्यवसाय सांभाळुन आपल्या वेळेनुसार व क्षमतेनुसार अभ्यास करु शकतो.

3.उच्चत्तर अविष्कार योजना (UAY)

सदर योजना विविध उद्योग क्षेत्राच्या मदतीने संशोधन प्रकल्पांना प्रोत्साहीत करते. यात २०१६-२०१७ पासुन दोन वर्षाच्या कालावधीसाठी ४७५ कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. यातील ५०% खर्च हा मनुष्यबळ विकास मंत्रालय करत असुन प्रत्येकी २५ % खर्च संबंधित उद्योग आणि यजमान शैक्षणिक संस्था उचलते. या योजनेचा उद्देश म्हणजे शिक्षण क्षेत्र व उद्योग क्षेत्र व उद्योग क्षेत्र एकमेकांना सोबत घेऊन काम करणे होय.व विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत उद्योगाची आवड निर्माण होईल.

4. शैक्षणिक माहीतीच्या उपलब्धतेसाठी जागतिक स्तरावर प्रयत्न (GIAN) .

नव-नवीन तंत्रज्ञान आणि इतर विकसीत देशातील ज्ञान आत्मसात करण्यासाठी देशातील काही संशोधन कार्यक्रमात सहभाग नोंदवण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर शास्त्रज्ञ आणि व्यावसायिकांना उच्च शिक्षण संस्थामधे सहभाग नोंदवुन त्यांच्या ज्ञानाचा फायदा इतरांना मिळण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालयांच्या या नव्या कार्यक्रमाचा हेतु आहे.

5. उच्च शिक्षण संस्थामध्ये नवकल्पनांचे अविष्कार योजना (IMPRINT)

उच्च शिक्षण देणाऱ्या इतर सर्व संस्थामध्ये नवनिर्माणची संस्कृती रुजविण्यासाठी भारत सरकारने संशोधनाची संस्कृती रुजविण्यासाठी भारत सरकारने संशोधन नवनिर्माण आणि तंत्रज्ञानाची निर्मीती केली आहे. Impacting research Innovation & Technology ( IMPRINT) नावाची नवीन आणि वैशिष्टया पूर्ण योजना नुकतीच तयार केली. संशोधनतुन हाती आलेल्या ज्ञानाचा फायदा दैनदिन व्यवहारात वापरता येण्याजोग्या उत्पादन किंवा प्राक्रियेत करणे हा या योजनेचा प्रमुख हेतू आहे. संशोधन आणि नवनिर्माण यांना प्रोत्साहनाचा विचार असुन सदर योजना ५ नोहेंबर २०१५ रोजी मा.राष्ट्रपती आणि पंतप्रधानांच्या हस्ते या योजनेची सुरुवात झाली.

6. स्वंयम योजना (SWAYAM Study webs of active learning for young aspiring minds)

योजना या योजन अंतर्गत प्राध्यापक तसेच IIT, IIMS, केंद्रीय विद्यापीठ हे नागरीकांना विविध ऑनलाईन अभ्यासक्रमांना प्रवेशा देतात तसेच सदर अभ्यासक्रम हा नि शुल्क असुन त्यासाठी प्रमाणपत्र व नाममात्र शुल्क आकारला जातो. सदर योजना २०१४ साली सुरु होऊन यात IIT कानपुर, गुवाघाटी, मुंबई,मद्रास ,बँगलोर इ.तसेच विविध केंद्रीय विद्यापीठात हे अभ्याक्रम चालवतात. यात सामाजिक शास्त्र ,

Scanned with AnyScanner

ऊर्जा ,अभियांत्रीकी , तसेच management ,मुलभुत विज्ञान इ. विषय असुन किमान एक करो
विद्यार्थ्यांना यांचा लाभ होईल अशी आशा आहे.

7. राष्ट्रीय ई -ग्रंथालय ( National E - Library )

सदर ई- ग्रंथालय हे एक ऑनलाईन सुविधा असुन यात दर्जात्मक ज्ञान तसेच दुर्मिळ पुस्तके, ग्रंथ, संशोधन विद्यार्थ्यी तसेच विविध शैक्षणिक संस्था कर्मचारी यांना देशातील इतर ग्रंथालयातील विविध पुस्तकां लाभ होता यावा साठी असुन देशातील केंद्रीय विद्यापीठांतील तसेच विविध विद्यापीठातील ग्रंथाचा ला संशोधक विद्यार्थी आपल्या लॅपटॉप ,स्मार्टफोन , संगणक इ.वर घेऊ शकतात. ही योजना शैक्षणिक व .२०१५ पासुन सुरु झाली. यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार साहीत्य कमी वेळ खर्च करुन उपलब्ध होऊ शकते.

8. पंतप्रधान संशोधन सहाय्यक योजना :- prime minister Research Fellows ( PMRE)

ही योजना १००० विदवान पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी असुन दरवर्षी १००० विद्यार्थ्यां संशोधन कार्यक्रमासाठी नामांकीत संशोधन संस्थामध्ये म्हणजे IISC, IITS इ. प्रवेश देऊन विद्यार्थ्यां ७०,००० ते ८०,००० इतके मानधन प्रति महीना ५ वर्षे सामाजीक संशोधनासाठी दिले जाणार आहे.

9.ई - पाठशाला :- ( e- pathshala)

सदर योजना ही NCERT मार्फत राबवली जात असुन त्यात पुस्तके , छापील व ध्वनीमृद्रीत तसे चित्राफित इ. त्यात ३,०६२ ध्वनीमृद्रीत साहीत्य तसेच व्हिडीओ ६५० इ -पुस्तके आणि ५०४ फिल्प पुस्त पोर्टल वर व मोबाईल ॲप वर उपलब्ध आहे.

सारांश :-

ज्ञानाधारित समाजाच्या विकासासाठी तसेच विकसनशीलतेकडुन विकसित देशात रुंपातरसाठ शैक्षणिक योजनामध्ये काळानुसार बदल होणे गरजेचे आहे. ज्ञान ही आता उत्सुकता शमविण्यासाठी गोष्ट नसुन ती आता काळाची गरज आहे. विविध संशोधन आणि तंत्रज्ञानाचा संशोधनामुळे मानवी जीवन सुखक होत असुन ज्ञान प्राप्तीचे मार्ग बदलत आहे. भारत देशातील लोकसंख्येला शिक्षणाची गरज मागविण्यासाठ वरील मार्ग मर्यादित असुन त्यासाठी ग्रामीण भारताच्या विकासाची गरज आहे. येणाऱ्या भावी पिढ्यासाठ पृथ्वीला जास्त चांगला , सुरक्षित आणि आधिक निरोगी ग्रह बनविण्यात सर्वानीच आपले योगदान देण्यासाठ शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही हे मान्य करणेच खरे.

संदर्भ :-

१. भारत सरकार मनुष्य बळ विकास मंत्रालय

Scanned with AnyScanner